**संक्षिप्त फौजदारी केस नं. २००/२०२०**
**नि. क्र. १९ लगत**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०५ चा जबाब शपथेवर सुरु.</u>**

**नाव** – प्रेरणा प्रविण खेडेकर,

**वय**– ३९ वर्षे , **व्यवसाय** – गृहिणी, **राहणार**– मार्लेश्वर, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून</u> –**

**०१**. मार्लेश्वर येथे मार्लेश्वर प्रसाद सोसायटी, देवरुख येथे रुम क्रमांक ०१ सदनिका ही रमेश काशीनाथ तेटांबे यांच्याकडुन आम्ही खरेदी घेतली होती व सन २०१७ मध्ये तेथे राहण्यास गेलो होतो.

**०२**. दिनांक २४/११/२०१९ रोजी मी माझ्या घरी हजर होते. त्यादिवशी दुसऱ्या मजल्यावर दरवाजा ठोकल्याचा मला आवाज आला. त्यामुळे मी सदर ठिकाणी गेले. त्यावेळी दुसऱ्या मजल्यावर सदनिका क्रमांक ०९ व १० ची दरवाजाची कुलुपे नयना यादव हिने तोडली होती व ती आतमध्ये गेले होती. त्यावेळी पहिल्या मजल्यावरील सदनिका क्रमांक ०६ मध्ये राहणारे व्यंकप्पा गवंडी हे देखील तेथे आले होते.

**०३**. त्यानंतर थोडयावेळाने रमेश तेटांबे व त्यांची पत्नी तेथे आल्या. त्यांनी नयना यादव यांना सदर खोली खाली करण्यासाठी सांगितले. त्यानंतर तेटांबे पोलीस ठाण्यामध्ये तक्रार देण्यासाठी गेल्याचे मला कळाले. सदरची घटना मी व व्यंकप्पा गवंडी यांच्यासमोर घडली आहे. नयना यादव यांचा तेटांबे सोबत सदर रुमचा व्यवहार जमला नव्हता. नयना यादव यांना दाखविल्यास मी ओळखु शकते. आज रोजी नयना यादव न्यायालयात हजर नाहीत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. एस. जोशी यांच्याकडुन</u> –**

**०४**. माझे इयत्ता १२वी पर्यंत शिक्षण झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी घरकाम

करते. माझे पती प्रविण खेडेकर हे तुळसणी हायस्कुल येथे नोकरीस आहेत. पोलीसांनी माझे सदर घटनेबाबत टिपण नोंदविले होते. टिपण नोंदविताना मार्लेश्वर प्रसाद सोसायटी मध्ये रुम नंबर ०१ सदनिकेत सन २०१७ साली मी राहायला गेल्याचे पोलीसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१७ साली मी राहायला गेल्याचे मी खोटे कथन केले आहे.

**०५**. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २४/११/२०१९ रोजी रमेश तेटांबे त्यांच्या पत्नीसह येवुन त्यांनी नयना यादव यांना खोली खाली करण्यास सांगितल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, रमेश तेटांबे यांची पत्नी – रेखा तेटांबे ही त्यादिवशी सावर्डे येथे हजर असल्याने घटनास्थळी आलेलीच नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, नयना यादव हिने रमेश तेटांबे सोबत झालेला व्यवहार पुर्ण केला नसल्याची कागदपत्रे मी स्वतः पाहिली नाहीत व पोलीसांनी देखील मला ती दाखविली नाहीत.

**०६**. *''दिनांक २४/११/२०१९ रोजी मी माझ्या घरी हजर होते. त्यादिवशी दुसऱ्या मजल्यावर दरवाजा ठोकल्याचा मला आवाज आला. त्यामुळे मी सदर ठिकाणी गेले. त्यावेळी दुसऱ्या मजल्यावर सदनिका क्रमांक ०९ व १० ची कुलुपे नयना यादव हिने तोडली होती व ती आतमध्ये गेले होती. त्यावेळी तेथे पहिल्या मजल्यावर सदनिका क्रमांक ०६ मध्ये राहणारे व्यंकप्पा गवंडी हे देखील तेथे आले होते''*, हा मजकुर मी तपासटिपण नोंदविताना पोलीसांना सांगितला होता. तो मजकुर माझ्या तपासटिपणात का नमुद केला नाही, याचे काही कारण मला माहित नाही.

**०७**. रमेश तेटांबे त्यानंतर लगेच पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेल्याचे मी तपासटिपण नोंदविताना पोलीसांनी सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, रमेश तेटांबे यांच्यासोबत आमचे घरगुती संबंध असल्याने त्यांना मदत करण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, नयना यादव हिने सदनिका

क्रमांक ०९ व १० याची कुलुपे बेकायदेशीरपणे तोडली नाहीत व त्यामध्ये प्रवेश केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, नयना यादव हिने कोणतेही गैरकृत्य केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदनिका क्रमांक ०१ मध्ये मी राहत असल्याचा कोणताही पुरावा पोलीसांना दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही व आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.09.26 11:05:10 +0530

**(रोहिणी आर कुलकर्णी)**

दि. २५.०९.२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

## -:CERTIFICATE:-

Judgment/order/evidence in ( Order below Exh.1 in SC.C. No. 200/2020)

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date | :- | 25/09/2025 |
| Evidence signed by PO. on | :- | 25/09/2025 |
| Evidence uploaded on | :- | 26/09/2025 |